# 'मराठी' विषयातही आहेत करियरच्या ‘या’ खास संधी..



बड्या पगाराच्या नोकऱ्या, मोठाली पदे यासाठी ‘मराठी’ विषयामध्ये करियरच्या प्रचंड मोठ्या संधी उपलब्ध आहेत, पण आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे मराठीतून अगदी पदवी, पदव्युत्तर पदवी पर्यंत शिक्षण घ्यायला काहीच हरकत नाही. आता जाणून घेऊया ‘मराठी’मध्ये नेमक्या संधी काय आहेत. जेव्हा आपण मराठी भाषेचे शिक्षण घेतो तेव्हा भाषेसोबत आपले वाचन, साहित्य अभ्यास, लेखन, भाषण, श्रवण आदी कौशल्ये विकसित होतात. त्यामुळे बुध्दीमत्तेसोबतच कौशल्यावर आधारित नोकऱ्या आपल्यासाठी खुल्या होतात.

## मराठी विषयातील करियरच्या वाटा...

### *‘मराठी’ विषय घेऊन तुम्ही नेमकं काय करू शकता :*




**स्पर्धा परीक्षा :** शासकीय अधिकारी होण्यासाठी लाखो तरुण स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतात. या विद्यार्थ्यांसाठी मराठी विषय हे वरदानच आहे., कारण ‘एमपीएससी’ परीक्षेत मराठीचा स्वतंत्र पेपर आहे . पीएसआय, एसटीआय या पदांसाठीच्या मुख्य परीक्षेत २५ टक्के अभ्यासक्रम मराठी व्याकरणाचा असतो. तर ग्रामसेवक, तलाठी, पोलीस, क्लार्क, मंत्रालय सहाय्यक या व इतर परीक्षा, या प्रत्येक परीक्षेत मराठी विषय असतोच. तर ‘यूपीएससी’ला ही ‘मराठी’ विषय निवडून परीक्षा देता येते.



**शिक्षक, प्राध्यापक :** महाराष्ट्र शासनाने 'मराठी' हा विषय महाराष्ट्रातील सर्व इंग्लिश मिडीयम स्कूल, इतर माध्यमाच्या शाळा व महाविद्यालयांमध्ये सक्तीचा केला आहे. त्यामुळे मराठी मधून पदवीचे शिक्षण घेऊन तुम्ही १ली ते एम. ए. पर्यंतचे  शिक्षक किंवा प्राध्यापक होऊ शकता. केवळ महाराष्ट्रातच नाही तर गुजरात,, गोवा, मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगाना, सेलवासा, दीव दमन व इतर अनेक राज्यांमध्ये, अनेक ठिकाणी मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. या क्षेत्रात खूपच संधी आहेत.




**दुभाषिक आणि भाषांतरकार :** दोन देशांचा, दोन भाषांचा समन्वय साधण्यासाठी दुभाषिकांची खरी गरज असते. हीच मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे. मंत्रालय, न्यायालय, शासकीय कार्यालयापासून ते खासगी कंपनी पर्यंत या नोकऱ्या उपलब्ध आहेत. अनुवाद हा देखील त्याचाच एक भाग. भाषांतर करणारे अनुवादक ही काळाची गरज बनली आहे. अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील या संधी उपलब्ध असतात. तुम्ही मराठी विषय घेऊन उच्च शिक्षण घेऊन दुभाषक हा एक उत्तम करिअरचा पर्याय निवडू शकतात.



**डबिंग :** भाषांतराप्रमाणेच डबिंगचे काम असते. ज्यामध्ये कार्टून, चित्रपट किंवा वेबसिरीज यांचे मराठीत रूपांतर करायचे असते. तुमचे भाषेवर प्रभुत्व असेल, तुमच्याकडे आवाजाचे वेगळेपण असले तर डबिंगचे शिक्षण घेऊन तुम्ही उत्तम पैसे कमवू शकतात. कारण हल्ली अनेक मोठ्या कलाकृती मराठीत रूपांतरित केल्या जात आहे.



**वर्तमानपत्रे, पुस्तके मुद्रितशोधन व डीटीपी :** सध्या मुद्रितशोधन आणि डीटीपी यांचा एका पानाला ८० ते १२० रुपयांचा दर दिला जातो. आज माध्यमे, प्रकाशनसंस्था यामध्ये मुद्रितशोधकांना मोठी संधी आहे. यासोबतच 'डीटीपी' चा कोर्स केला तर लिहिलेला मजकूर टाईप करून त्याला डिजिटल सजवण्याच्या कौशल्याद्वारे आपण घरबसल्या उत्तम कमाई करू शकतो.



**चित्रपट, मालिका :** मनोरंजनाची साधने सध्या झपाट्याने बदलत असली तरी त्यातला एक दुवा कायम आहे तो म्हणजे मराठी भाषा. आजही मराठी चित्रपट, वेबसिरीज, मालिका, माहितीपट, लघूपट यांना मोठी मागणी आहे. त्यामुळे यासाठी मराठी लेखकांची गरज असते. मराठी विषयातून पदवीचे शिक्षण घेतल्याने आपल्या सृजनशक्तीचाहि विकास होतो, ज्यामुळे आपण लेखक होऊ शकतो. त्यातूनच पुढे पटकथा, संवाद, गीतलेखक अशा अनेक संधी मनोरंजन क्षेत्रात मिळतात.



**'कन्टेन्ट रायटर', सोशल मिडिया :** मराठी भाषेतून पदवी शिक्षण घेऊन आपण 'कन्टेन्ट रायटर' होऊ शकतो. ज्यामध्ये अनेक डिजिटल माध्यमे, पोर्टल, विकिपीडिया, नवसमाजमाध्यमे यासाठी आशय निर्मिती म्हणजे लेख, बातम्या, संहिता यांचे लेखन करू शकतो. अनेक शासकीय नोकऱ्या, कला विभाग, भाषा विभाग येथे असे लेखन करणाऱ्यांना संधी असते. तसेच स्वतःचे ब्लॉग लिहून, मुक्त पत्रकारिता करून, लेख लिहूनही स्वतःची ओळख निर्माण करू शकतो. तसेच भाषेत आशय निर्मिती करून यूट्यूबर देखील होऊ शकतो.




**फ्लेक्स, टीशर्ट मराठी प्रिंटीग :** आज फ्लेक्स बोर्ड लावणे व टी शर्ट वरती मराठी भाषेतील मजकूर छापण्याची मोठी फॅशन आहे. यासाठी मराठी भाषा व टायपिंग चे ज्ञान असणाऱ्यांना लोकांना मोठी मागणी आहे. मराठी भाषेचे पदवीधर म्हणून या क्षेत्रात आपणास नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, तसेच आपण स्वतःचा फ्लेक्स प्रिंटीग व्यवसाय सुरु करू शकतो.




**मराठी भाषेतून पदवी घेतलेले विध्यार्थी विविध कार्यक्रमात प्रभावी सूत्रसंचालन, निवेदन व भाषण करून उत्तमप्रकारे पैसे मिळू शकतात. आज या क्षेत्रात तरुणांना खूपसाऱ्या संधी खुणावता आहेत !**

